# मेट्रो-३ मार्गिकेसाठी नेहरू सायन्स म्युझियम येथे भुयारीकरण सुरू

**मुंबई :** कुलाबा-वांद्रे-सीप्झ या मेट्रो-३ मार्गाच्या भुयारीकरणाच्या कामाला आता गती आली आहे. या मार्गावर नेहरू सायन्स म्युझियम, आचार्य अत्रे चौक आणि वरळी मेट्रो स्थानकाच्या भुयारीकरणाला नुकतीच सुरूवात झाली आहे. मेट्रो-३ मार्गिकेमध्ये भुयारीकरणासाठी वापरले जाणारे टनेल बोरिंग मशिन्स (टीबीएम) तानसा-१ या मशीनची लांबी ८९ मीटर असून वजन सुमारे ४०६ मेट्रिक टन इतके आहे. नेहरू सायन्स म्युझिअम ते वरळीपर्यंतचे एकूण २.२किमी अंतराचे भुयार या मशिनद्वारे खोदण्यात येणार आहे. तसेच या मार्गाचे भुयारीकरण झाल्यानंतर सायन्स म्युझिअम ते मुंबई सेंट्रल या मार्गाचे भुयारीकरण सुरू होणार असल्याचे मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनतर्फे (एमएमआरसी) सांगण्यात आले. या मार्गिकेतील पॅकेज-३ चे भुयारीकरण हे प्रकल्पाचे मध्यवर्ती भुयारीकरण असून ते ठरलेल्या वेळेत यशस्वीरीत्या पूर्ण होईल, असा विश्वास एमएमआरसीच्या व्यवस्थपकीय संचालिका अश्विनी भिडे यांनी व्यक्त केला. मुंबई मेट्रो-३ या संपूर्ण प्रकल्पासाठी लागणारी एकूण १७ पैकी १६ टीबीएम मशीन्स मुंबईत दाखल झाली असून, सध्या१३ मशीन्स मुंबई मेट्रो ३ साठी कार्यरत आहेत. गेल्याच आठवड्यामध्ये कफ परेड ते हुतात्मा चौक या पॅकेज-१ च्या भुयारीकरणाचा शुभारंभ करण्यात आला होता. यामुळे कफ परेड, विधान भवन, चर्चगेट आणि हुतात्मा चौक ही मेट्रो स्थानके जोडली जाणार आहेत.